


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : १४० वा मंगळवार दि. ०८ जुलै २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# सहकार विभागाची कडक कारवाई, ४१ कार्यकारी सेवा सहकारी संस्थांची नोंदणी रद्द...

**वृत्तसंस्था/ परभणी**

स्थानिक राजकारण आणि जिल्हा मध्यवर्ती बँकेची निवडणुकीत सहभाग घेण्यासाठी बोगस व नियमबाह्य पध्दतीने स्थापन करण्यात आलेल्या सर्व विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांची नोंदणी रद्द करण्यात यावी, अशी लक्षवेधी मागणी स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी २० मार्च २०२५ रोजी मुंबई येथील अर्थसंकल्पीय अधिवेशनात सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्याकडे केली होती. त्यावर उत्तर देताना संबंधित संस्थांना सहकारी संस्था अधिनियम कायद्याच्या कलम १२ अन्वये नोटीस देण्यात आली असून येत्या ६० दिवसात त्याचे उत्तर समाधानकारक आले नाही, तर संबंधित विभागीय उपनिबंधकांना कडक कारवाई करण्याचे आदेश दिले जातील, असे सहकारमंत्र्यांनी आश्वासन दिले होते. आता त्या कारवाईला वेग आला असून महाराष्ट्र सहकारी संस्थेचे कलम २१ अ नुसार तालुक्यातील गंगाखेड, बडवणी, पोखर्णी वा, पिंपळदरी, बोर्डा, कातकरवाडी, पिसेवाडी, कड्याचीवाडी, उखळी, अंतरवेली, वागदरी, गोदावरी तांडा, वागदेवाडी, बनपिंपळा, कोद्री, मुळी, सिरसम, आनंदनगर, डोंगरगांव, तांदुळवाडी या गावांमधील तब्बल ४१ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांची बोगस नोंदणी रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे स्थानिक आमदार डॉ.गुट्टे यांच्या लक्षवेधीचा त्या संस्थांना दणका बसला असल्याची खमंग चर्चा जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात सुरू आहे. याविषयी स्थानिक आमदार रत्नाकर गुट्टे यांनी महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्षवेधी मांडून मतदारसंघातील बोगस व नियमबाह्य सहकारी संस्था आणि सभासदांवर नियमाप्रमाणे कारवाई करा, अशी रोखठोक मागणी केली होती. तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० मधील कलम ६ नुसार, कोणतीही सहकारी संस्था नोंदवताना त्या संस्थेचे सभासद हे एकाच कुटुंबातील नसावे. तसेच ते सभासद त्याच संस्थेच्या कार्यक्षेत्रातीलच रहिवासी असले पाहिजेत. शिवाय, समान उद्देश असलेल्या दुसऱ्या सहकारी संस्थेचे ते सभासद नसले पाहिजे अशी स्पष्ट तरतूद आहे, असेही सभागृहाच्या निर्देशनास आणून दिले होते. शिवाय, आपल्या विधानसभा मतदारसंघाच्या कार्यक्षेत्रातील गंगाखेड व पूर्णा तालुक्यात धान्य अधिकोष सहकारी संस्थांची मोठ्या प्रमाणात बोगस व नियमबाह्य नोंदणी झाली आहे, हेही राज्य सरकारच्या लक्षात आणून दिले होते. केवळ राजकीय स्वार्थापोटी संबंधित सहाकरी संस्थांच्या बोगस नोंदी झाल्या आहेत. त्यातून जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीत सहभाग घेतला जातो. बोगस नोंदणीत एका गावात नवरा चेअरमन, तर दुसऱ्या गावात बायको चेअरमन, असेही प्रकार घडले आहेत. शिवाय, तालुक्याच्या महसूल अभिलेखावरती गावाची नोंद नसताना आणि असे कोणतेच गाव अस्तित्वात नसताना देखील तिथे महसुली गावाची नोंद आहे, असे दर्शवून दुसऱ्या गावचे किंवा त्या वस्तीचे रहिवाशी दाखवून संस्थेची नोंदणी केलेली आहे. सदरील संस्था ह्या एकाच व्यक्तीने जाणीवपूर्वक राजकीय उद्देश ठेवून नोंदणी केलेल्या आहेत. सदरील संस्था नोंदवून ते जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीमध्ये भाग घेतात व चुकीच्या मार्गाने बँकेचे संचालक म्हणून निवडून येतात. त्यामुळे ग्रामीण भागातील गोरगरीब शेतकऱ्यांसाठी पीक कर्ज वाटप करणाऱ्या विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेवरती अन्याय होतो. अशा संस्था आपण रद्द करणार आहात का? आणि जर कायद्याचे उल्लंघन करून अशा संस्था नोंदवलेल्या असतील तर त्यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करणार आहात का? अशा जर खोट्या माहितीच्या आधारे संस्थेची नोंदणी झालेली असेल, तर महाराष्ट्र सहकारी संस्थेचे कलम २१ अ नुसार अशा संस्थेची नोंदणी रद्द करण्याचे सर्वस्वी अधिकार विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था यांना बहाल करण्यात आलेले आहेत. परंतु ते कोणतेही कार्यवाही करताना दिसत नाहीत, असेही आ.डॉ.गुट्टे यांनी आवर्जून सांगितले होते. संबंधित संस्थांची नोंदणी चुकीच्या कागदपत्रांच्या आधारे झाली आहे. ग्रामसेवकांनी चौकशी केली असता, सदरील संस्थेचे सभासद एकाच कुटुंबातील असून काही सभासद हे संस्थेच्या कार्यक्षेत्रात राहत नाहीत, असा लेखी अहवाल आला आहे. त्यामुळे



सर्व संस्थांची पारदर्शकपणे चौकशी झाली पाहिजे. अशा संस्थेच्या नोंदणीमुळे ग्रामीण भागातील गोरगरीब शेतकऱ्यांसाठी काम करणाऱ्या विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, या सहकारी संस्थेचे व पर्यायाने संपूर्ण सहकार क्षेत्राचे अस्तित्व धोक्यात आलेले आहे. त्यामुळे सहकार क्षेत्र ग्रामीण भागात रुजवायचे असेल, तर अशा बोगस व खोट्या संस्थेवरती आपण काही कारवाई करणार आहात का? जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही एक वित्तीय संस्था आहे व त्या वित्तीय संस्थेवरती कर्ज पुरवणाऱ्या संस्थेचेच प्रतिनिधी असावेत परंतु धान्य अधिकोष संस्था कोणतीही कर्ज वाटप करत नाही. तरीही त्यांचे प्रतिनिधी हे वित्तीय संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये किंवा संचालक मंडळामध्ये सामील झालेले आहेत. तर त्यावरती आपण काही कारवाई करणार आहात का? शिवाय, अशा लोकांवर कडक कारवाई होण्यासाठी कायमस्वरूपी परिपत्रक काढणार का? असेही प्रश्न आ.डॉ.गुट्टे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपस्थित केले होते.

## कवठळच्या वारकऱ्याचा पंढरपुरात हृदयविकाराने मृत्यू

**जनसंचलन/ चिखली**

आषाढी वारीच्या निमित्ताने पंढरपूरला गेलेल्या बुलढाणा जिल्ह्यातील कवठळ (ता. चिखली) येथील ४० वर्षीय रामदास निंबाजी पडघान या वारकऱ्याचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी सकाळी पंढरपुरात घडली. पडघान हे गावातील काही भाविकांसह वारीसाठी पंढरपूरला गेले होते. शुक्रवारी सकाळी त्यांनी चंद्रभागा नदीत स्नान केले. दर्शनासाठी जात असताना वाटेत त्यांनी मित्रांसोबत चहापाणी घेतले. यावेळी त्यांना अचानक



हृदयविकाराचा झटका आला. आजूबाजूच्या मित्रांनी तत्काळ त्यांना जवळच्या रुग्णालयात हलवले. मात्र उपचार सुरू होण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. घटनेची माहिती मिळताच पंढरपूर पोलिसांनी घटनास्थळी येऊन पंचनामा करून आकस्मिक मृत्यूची नोंद केली. वारीसाठी गेलेले सर्व गावकरी शोकमग्न अवस्थेत पडघान यांच्या पार्थिवासह गावी परतले. त्यानंतर रात्री उशिरा त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. रामदास पडघान त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, भाऊ, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे.

## रस्त्यावर अतिक्रमण; शेगावात वाहतूक कोंडी

**जनसंचलन/ शेगाव**

भागातील नगरपरिषद शाळा क्रमांक ५ ते स्वामी विवेकानंद चौक या मुख्य मार्गावर बेशिस्त वाहतूक आणि फ`रीवाल्यांमुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण झाला आहे. परिणामी, या मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली असून, वेळेत उपाययोजना न केल्यास संपूर्ण रस्ता बंद होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याकडे शेगाव पोलिस प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. सोमवार, दि.७ जूलै रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले. निवेदनानुसार, श्री गजानन महाराज पालखी मार्गाचा भाग असलेल्या या रस्त्याचे काही वर्षापूर्वी अतिक्रमण हटवून रुंदीकरणाचे काम करण्यात आले होते. मात्र, सध्या या मार्गावर फ`रीवाल्यांनी दोन्ही बाजूंना अतिक्रमण करून हातगाड्या आणि टपऱ्या उभारल्या आहेत. यामुळे शाळकरी मुले, महिला, नागरिक, रुग्णवाहिका तसेच एस.टी. बसेस यांना मार्गक्रमण करताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. भाजीपाला विक्रीसाठी ठेवलेल्या गाड्या आणि दुचाकी-चारचाकी वाहनांची बेशिस्त पार्किंग यामुळे रस्त्याचा मोठा भाग कायमस्वरूपी अडवला गेला आहे. उर्वरित रस्ताही लवकरच अतिक्रमणाच्या विळख्यात सापडण्याची चिन्हे आहेत. काही व्यावसायिकांनी तर थेट आपल्या दुकानांसमोर रस्त्यावरच वाहनं उभी करून वाहतुकीला अडथळा निर्माण केला आहे. त्यामुळे भविष्यात एखादा मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# संशोधकांचे मूल्यमापन...

## संपादकीय लेख

भारतामध्ये संशोधकाचे पर्यायाने संशोधनाचे मूल्यमापन एक व्यापक आणि अनेक बारकावे असलेला विषय आहे. कुठल्याही संस्थेत भरती करताना वा पदोन्नती देताना अनेक निकष हे अनियंत्रित, मनमानी आणि व्यक्तिनिष्ठ असल्याने संशोधकांचे मूल्यमापन हा एक वादाचा विषय होऊ शकतो. त्यातून डेटाबेस आणि सायन्टोमेट्रिक तंत्रांच्या म्हणजे प्रकाशनांच्या संख्येला दिलेले अतिरेकी महत्त्व, प्रभावशीलता (इम्पॅक्ट फॅक्टर), एच-इंडेक्स यामुळे हे मूल्यमापन पुरते भरकटलेले आहे, असे दिसून येते. या अतिशय जुजबी रीतीने मूल्यमापन करणाऱ्या पद्धती आहेत. एखादा प्रकल्प निवडणे आणि त्याला भरमसाठ पैसा पुरविणे आणि त्यापुढे संशोधकाने त्या प्रकल्पाचे उत्तरदायित्व न स्वीकारणे या घटना सातत्याने सरकारी पातळीवर घडत असतात. त्याचप्रमाणे भारतातील ॲकॅडमी फेलोशिप, पुरस्कार हे खूपदा व्यक्तिनिष्ठ असतात. काही अनुभवी संशोधक पुरस्कार, उमेदवार आणि समिती सदस्य कोण हे भाकित करू शकतात! खूपदा काही उमेदवार या बाबतीत ड्ड्योग्यफ पावले उचलतात. त्याचमुळे हे खरोखरचे मूल्यमापन आहे का, हाच प्रश्न आहे. प्रभावशीलता आणि एच-इंडेक्स हे निश्चितच उपयोगी आहेत. काहींच्या मते एच-इंडेक्स हा व्यावसायिक यश मोजण्याचा मानदंड आहे, हे सरसकट समजणे भोळसटपणाचे म्हणावे लागेल. वास्तविक प्रभावशीलता ही पेपरची नसते, तर जर्नलची असते आणि सर्वच पेपर्स तितक्या संख्येने उद्धृत केले जात नाहीत. सन २०१८मधील एका रीसर्च पेपरमध्ये म्हटल्याप्रमाणे अतिशय कमी चांगले पेपर्स हे त्या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या सर्व पेपर्सना तारून नेतात. दुसरा चुकीचा घटक म्हणजे एच-इंडेक्स, जो रीसर्च पेपर्सचा नंबर आणि तो किती वेळा उद्धृत केला गेला यावर अवलंबून असतो. पेपरमध्ये किती जणांचा सहभाग आहे आणि खरोखर त्या संशोधकाचे किती योगदान आहे हे बघणेही तितकेच गरजेचे आहे. मात्र, त्याकडे दुर्लक्ष होताना आढळते. सन १९६३मध्ये ड्सायन्स सायटेशन इंडेक्सफ्बाबत अमेरिकी भाषाशास्त्रज्ञ यूजीन गारफिल्ड यांनी चिंता व्यक्त केली होती. संशोधकांची भरती, पदोन्नती, पुरस्कार, अनुदान यांचा अतिरेकी वापर अयोग्य आहे, असे त्यांनी अधोरेखित केले होते. आपण वाईट विज्ञानाबद्दल काळजी व्यक्त करतो, पण त्या संदर्भात प्रभाव घटकांचा चुकीचा वापर होत असतो त्याचे काय करायचे, असा प्रश्न प्रा. बलराम यांनी केला होता. संशोधकांनी दूरदृष्टी ठेवून संशोधनाचा विषय निवडणे गरजेचे आहे. खूपदा संशोधन म्हणजे दुसऱ्याचे काम पुन्हा करणे, असेच असते. आधीच्याच कामाची पुनरावृत्ती केली जाते. सी. व्ही. रामन यांच्यासारखे हाताच्या बोटांवर मोजता येणारे शास्त्रज्ञ भारतात तयार झाले. रिचर्ड फाईनमन हे भौतिकशास्त्रातील १९६५चे नोबेल विजेते शास्त्रज्ञ व संगीतप्रेमीही. चांगला प्रश्न शोधा आणि तो सापडला तर नोबेल मिळवा नाहीतर बोंगो ड्रम्स वाजवा, हे त्यांचे म्हणणे! २८ जानेवारी १९८६ रोजी अमेरिकेच्या चॅलेंजर या अंतराळयानाचा स्फोट झाला. ते जळून खाक झाले. त्याची कारणे शोधण्यासाठी जी समिती नेमण्यात आली तिचे फाईनमन हे सदस्य होते. अंतराळ यानाची निर्मिती करणाऱ्यांशी त्यांनी चर्चा केली आणि एका साध्या ओ-रिंगमुळे हे घडले हे त्यांनी सप्रमाण सिद्ध केले. सन १९६८मध्ये शरीरविज्ञान आणि मेडिसिनमध्ये रॉबर्ट डब्ल्यू. होली, अमेरिकेत संशोधन करणारे भारतीय संशोधक हरगोविंद खुराणा आणि मार्शल डब्ल्यू. निरेनबर्ग यांना नोबेल विभागून मिळाले. हरगोविंद खुराणा यांना भारतात राहून हे जमले असते का, असा प्रश्न मनात येतो. सन १९६०मध्ये शरीरविज्ञान आणि मेडिसिनमधील नोबेल मिळवणारे सर पीटर ब्रायन मेदावार यांच्या मते, अंतर्मनाचा कौल आणि प्रेरणा या गोष्टी संशोधनाचा पाया आहेत. जॉन बारडीन यांना भौतिकशास्त्रात दोन वेळा - एकदा ट्रान्झिस्टरच्या शोधासाठी तर नंतर अतिवाहकतेच्या सिद्धान्तासाठी - नोबेल मिळाले. मेरी क्यूरी, लिनस पाउलिंग, फ्रेडरिक सेंगर आणि कार्ल बॅरी शार्पलेस या चौघांनाही दोनदा नोबेल मिळाले. या पार्श्वभूमीवर आपल्या संशोधकांना अंतर्मनाचा कौल कधी ऐकू यायला लागेल, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. अनेक भारतीय संशोधकांचे ३००-४००च्या वर रिसर्च पेपर्स आहेत, तर काहींनी एक हजाराचा आकडा पार केलेला आहे. तरीही नोबेल पारितोषिक मिळण्याच्या जवळपासही हे संशोधक जात नाहीत. याचे कारण काय असू शकेल? नोबेल पारितोषिक हा नवनिर्मितीसाठी, ज्यामुळे वैज्ञानिक प्रगती होईल अशा मूलभूत संशोधनासाठी दिला जातो. त्यामुळे किती पेपर्स प्रसिद्ध केले याला तसे महत्त्व दिले जात



नाही. बहुतेक वेळा भारतीय संशोधकांचा वेळ हा अधिकाधिक सरकारी अनुदाने मिळविणे, सायन्स मॅनेजमेंट आणि सरकारी बैठका यांतच जातो. अर्थात, कुठल्याही संशोधनाचे फलित नोबेल पारितोषिकच असते, असेही नाही. पण संशोधन हे लोकोपयोगी असावे किंवा त्याच्यामुळे खरोखर ज्ञानाच्या कक्षा रुंदावाव्यात, अशी अपेक्षा असते. प्रा. पांडुरंग खानखोजे यांना कोणतेही पुरस्कार, मानसन्मान मिळाले नाहीत; पण त्यांनी मेक्सिको आणि भारतातील शेतकऱ्यांसाठी तयार केलेल्या गहू, मका आणि अन्य अनेक पिकांच्या जाती आजही वापरल्या जातात. प्रा. नॉर्मन बोरलॉग यांच्या आधी जवळजवळ ३० वर्षे त्यांनी हरित क्रांतीचा पाया रचला. यापेक्षा वेगळी कोणती पोचपावती असावी? भारतातील विज्ञानाचे जनक, बहुआयामी संशोधक सर जगदीशचंद्र बोस यांनी भौतिकशास्त्र, वनस्पतीशास्त्र आणि रेडिओ विज्ञान ह्या विषयांमध्ये मोठे योगदान दिले. तीच गोष्ट भारतीय वंशाचे प्रा. आनंद चक्रवर्ती यांची. डायमंड विरुद्ध चक्रवर्ती हा सूक्ष्मजीवाणूमध्ये आनुवंशिक अभियांत्रिकी करून त्याबद्दल पेटंट घेण्याबद्दलचा खटला सन १९७३मध्ये अमेरिकेत गाजला आणि त्यांनी तो जिंकला. त्यांच्यामुळे अनेक संशोधकांना नंतर अशा प्रकारची पेटंट घेता येऊ लागली.

# जवाहर नवोदय विद्यालयात इयत्ता सहावी प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू

**जनसंचलन/बुलडाणा**

पीएम श्री स्कूल जवाहर नवोदय विद्यालयात इयत्ता सहावी प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या निवड चाचणी परीक्षेचे ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. संपूर्ण निवासी स्वरूपाचे शैक्षणिक सत्र २०२६-२७ करीता पात्र विद्यार्थ्यांनी २९ जुलैपर्यंत ऑनलाइन पद्धतीने अर्ज करावा, असे आवाहन श्री स्कूल जवाहर नवोदय विद्यालयाचे प्राचार्य आर.आर.कसर यांनी केले आहे.




पात्रता : विद्यार्थी इयत्ता पाचवीमध्ये २०२५-२६ सत्रात बुलडाणा जिल्ह्यातील सरकारमान्य शाळेत शिकत असावा. विद्यार्थ्यांचे पालक हे बुलडाणा जिल्ह्याचेच रहिवासी असावेत. जन्मतारीख १ मे २०१४ ते ३१ जुलै २०१६ (दोन्ही तारखा धरून) या दरम्यानची असावा, विद्यार्थ्यांने इयत्ता तिसरी, चौथी, पाचवी सलग सरकारमान्य शाळेतून शिकलेले व उत्तीर्ण असावा. आवश्यक कागदपत्रे: विद्यार्थी व पालकांच्या स्वहस्ताक्षरीत सही व छायाचित्र जेपीजी फॉरमॅटमध्ये स्कॅन करून अपलोड करावे, अनुसूचित जाती (), जमाती () व इतर मागासवर्गीय () प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी जात प्रमाणपत्र अपलोड करणे आवश्यक. परीक्षेची तारीख शनिवार दि. १३ डिसेंबर २०२५ असून www.navodaya.gov.in या संकेतस्थळावर नि:शुल्क भरु शकता. सर्व इच्छुक पालक व विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

# जिल्हा कारागृहात क्षयरोग दुरीकरण मोहिम बंद्यांची तपासणी व जनजागृती कार्यक्रम

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा कारागृह, बुलढाणा आणि जिल्हा क्षयरोग कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कारागृहातील बंद्यांची तपासणी करून राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण मोहिमेला सुरुवात करण्यात आली. या मोहिमेअंतर्गत बंद्यांमध्ये क्षयरोगासंदर्भात जनजागृती निर्माण करण्यासाठी विशेष शिबिर आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा कारागृहाचे अधीक्षक संदीप भुतेकर हे होते. जिल्हा क्षयरोग अधिकारी वर्षा गुट्टे यांनी बंद्यांना क्षयरोगासंबंधी मार्गदर्शन केले. शिबिरात बंद्यांची आधुनिक एक्स-रे मशिनद्वारे तपासणी करण्यात आली. तसेच क्षयरोगाच्या संशयित रुग्णांचे थुंकीचे नमुने घेऊन तपासणीसाठी पाठवण्यात आले. या तपासणीतून कारागृहातील आरोग्यस्थितीवर लक्ष ठेवण्याबरोबरच क्षयरोगाचे लवकर निदान करून उपचार शक्य होणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वरिष्ठ तुरुंगाधिकारी मेघा बाहेकर, तुरुंगाधिकारी उमेश नाईक तसेच जिल्हा क्षयरोग कार्यालयातील डॉ. शिवदास सरोदे, सिध्देश्वर सोळंकी, राजेंद्र सुरडकर, मुकेश घेंगे, राजेंद्र सरोदे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कारागृहातील अधिकारी व कर्मचारी यांनी देखील उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या उपक्रमाद्वारे जिल्ह्यातील राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण मोहिमेची प्रभावी सुरुवात करण्यात आली असून, बंद्यांच्या आरोग्य रक्षणाच्या दृष्टिकोनातून ही मोहीम अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# घोटाळे, घड्याळ, धंदे, अफाट माया अन् ईडी; ठाकरेंच्या शिलेदाराचा सरनाईकांवर पत्रातून प्रहार...

**मुंबई:** ज्या बडव्यांच्या नावानं छाती बडवून राज ठाकरे पक्षाबाहेर पडले, त्यांच्याच कडेवर जाऊन बसले, असा टोला परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी मनसे प्रमुख राज ठाकरेंना लगावला. उद्धव ठाकरे यांनी मराठीची टोपी घालून महापालिकेची सत्ता उपभोगली आणि मराठी माणसाला टोपी घालण्याचं काम केलं, अशा शब्दांत सरनाईक यांनी शिवसेना उबाठाच्या प्रमुखांना लक्ष्य केलं. यानंतर आता ठाकरेंचे निष्ठावंत, माजी खासदार राजन विचारे यांनी सरनाईक यांना प्रत्युत्तर दिलं आहे. उद्धव आणि राज ठाकरेंच्या संयुक्त मेळाव्यानंतर सरनाईक यांनी उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांना खुलं पत्र लिहिलं. त्यातून त्यांनी दोन्ही ठाकरेंना लक्ष्य केलं. तुमच्याकडे बघून काय होतास तू काय झालास तू.. अरे वेड्या कसा वाया गेलास तू..., या गाण्यातील ओळी आठवल्या, असं म्हणत विचारेंनी सरनाईक यांच्यावर शाब्दिक हल्ला चढवला. सरनाईकांच्या पत्राला विचारेंनी पत्रातूनच उत्तर दिलं आहे.दरवर्षीप्रमाणे यंदाही आषाढी एकादशी निमित्त पंढरपूर येथे



विठ्ठलाच्या दर्शनासाठी जाण्यासाठी मी रविवारी सकाळी घरातून बाहेर पडलो, गाडीत बसलो. प्रवास सुरु होताच एक बातमी सोशल मीडियावर आली. ती वाचत असताना माझ्या चालकाने नेहमीप्रमाणे रेडिओ लावला. तर पहिले मराठी गाणे लागले. आणि खरच सांगतो मला तुमची आठवण आली. ते गाणे ऐकत असताना जोरजोरात हसू लागलो कारण त्या गाण्याचे बोल तंतोतंत तुम्हाला लागू होताना मला जाणवलं... गाणं १९७५ सालातील झुंज या चित्रपटातील होतं. कोण होतास तू.. काय झालास तू... अरे वेड्या कसा वाया गेलास तू... या गाण्यातील ओळी तुमच्याकडे पाहिल्यानंतर मला आठवल्या. खरं तर पत्र लिहीण्याचे कारणच नव्हते मात्र, आपण पत्रकबाजी करून जे अकलेचे तारे तोडले आहेत. म्हणून हे पत्र लिहावे वाटले आणि या पत्रातून मलाही मनातल्या भावना व्यक्त कराव्याशा वाटल्या आहेत. प्रताप सरनाईक अत्यंत साध्या घरात तुमचा जन्म झाला. तुमचे लहानपण डोंबिवलीत गेलं. तुमचे धंदे मी देखील जवळून पाहिले आहेत. त्यानंतर तुम्ही ठाण्यात आलात. त्यानंतर तुम्ही त्या काळात काँग्रेस पक्षातून राजकारणाला सुरुवात केलीत. मग राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये शिरकाव केलात. तिथेही रत्नजडीत घडयाळांची भेट देऊन वरिष्ठ नेत्यांशी सलगी करण्याचे तुमचे प्रताप सर्वश्रुत आहेत. पुढे राष्ट्रवादीत मित्राशी संघर्ष वाढल्याने परस्पर शिवसेनेशी सवतासुभा मांडुन आमदारकीची झुल पांघरलीत. नगरसेवक ते आमदार बनल्यानंतर तुम्ही तुमचं अख्ख कुटुंबही राजकारणात सक्रीय केलत. ठाकरे नावामुळेच शिवसेनेत मोठे झालात. त्यानंतर, अचानक उपरती झाल्याचे गद्दार गटामध्ये जाऊन तुम्ही तुमची निष्ठा दाखवलीत. असो... दरम्यानच्या काळात स्थानिक नेत्यांचा विरोध असताना देखील हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांनी विश्वास तुमच्यावर ठेवला, तिकीट दिले आणि भरभरून प्रेमही दिले.

त्यानंतर पक्षाच्या नावावर तुम्ही अफाट माया देखील कमावलीत. ती एवढी की सध्या ज्यांच्या मांडीला मांडी लावून तुम्ही बसले आहात तेच तुमच्या मागे ३ महिने लागले होते. तुमच्या त्याच नेत्याच्या नगरविकास मंत्रालयाने त्यावेळी लोकायुक्तांकरवी तुमच्या चौकशीचे आदेश जारी केले होते. एमएमआरडीएतील टॉप्स सिक्युरिटी घोटाळा ,एमएसईल जमीन घोटाळा अशा तुमच्या अनेक घोटाळ्यांमुळे ईडीचा ससेमिरा तुमच्या मागे लागला होता. त्यामुळे तुमचे काळे धंदे हे सर्वसामान्य जनतेला चांगलेच माहीत आहेत. ज्यांनी आपल्याला मोठं केले त्यांना तरी विसरू नये असे मोठी माणसे नेहमी सांगत असतात. असो, तुम्हाला विरोध असताना देखील पक्षप्रमुख उद्धव ठाकरे साहेबांनी एकदा मला सांगितले. कोणत्याही परिस्थितीत प्रताप निवडून आला पाहिजे, त्यांनतर ठाण्यातील शिवसैनिकांनी जीवाचे रान करून, छातीवर दगड ठेवून तुम्हाला निवडून आणले. सरनाईकजी तुमच्या घरातील सदस्यांना फक्त एकदा विचारा नगरसेवक असताना त्यांना कोणी त्रास दिला. याचे उत्तर तुम्हाला घरातच मिळेल. कारण ती माणसे सध्या तुमच्या आजूबाजूलाच आहेत, हे मात्र लक्षात ठेवा. आणि महत्वाचे म्हणजे भूतकालः न विस्मर्तव्यः याप्रमाणे मागील वेळ विसरू नका.

खर तर तुम्ही आणि ढुंगणाला पाय लावून पळालेल्या तुमच्या नेतृत्वासमोर महाराष्ट्रातील एवढे प्रश्न समोर असताना तुमचे स्वार्थी राजकारण सुरू आहे. तुमच्या या घाणेरडया राजकारणाची मराठी माणसाला कीव येत आहे. एकीकडे विकासाच्या नावाने बोंबाबोंब सुरू आहे. दुसरीकडे मर

# मराठा समाजाने ओबीसी म्हणून नोंद केल्यास...; जातनिहाय जनगणनेसंबंधी समीर भुजबळांनी दिला इशारा...

**नागपूर :** केंद्र सरकारने जाहीर केलेल्या जातनिहाय जनगणनेत मराठा समाजाने ओबीसी म्हणून नोंद केल्यास त्याचा विरोध करण्यात येईल, असा इशारा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे कार्याध्यक्ष माजी खासदार समीर भुजबळ यांनी दिला. त्यांच्या या इशाऱ्यामुळे नजिकच्या काळात नवा वाद चिघळण्याची शक्यता आहे. जातनिहाय जनगणनेबाबत समता परिषदेच्या माध्यमातून जनजागृती आणि परिषदेचा विस्तार करण्यासाठी भुजबळ यांनी दोन दिवसांचा विदर्भ दौरा केला. त्यांनी पदाधिकारी व कार्यकत्यांशी जिल्हानिहाय संवाद साधला. जनगणनेबाबत सजग राहण्याची सूचना केली. यावेळी बापू भुजबळ, ईश्वर बाळबुधे, दिवाकर गमे आदी उपस्थित होते. बैठकीनंतर पत्रकार परिषदेत बोलताना समीर भुजबळ म्हणाले, मराठा समाजातील नागरिकांनी ओबीसी म्हणून नोंद केली तरी, त्यांना पुरावा द्यावा लागेल. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक योजनेचा मराठा समाजाला लाभ मिळत आहे. जातनिहाय जनगणनेत चुकीची माहिती देणाऱ्यांना शिक्षेची तरतूद असल्याने कारवाई होऊ शकते. जनगणनेत चुकीच्या नोंदी ग्राह्य धरल्यास ओबीसींची लोकसंख्या वाढेल. तीनशे पन्नास जातींचा समावेश असणाऱ्या ओबीसींसाठी २७ टक्के आरक्षणाची तरतूद आहे. यात विमुक्त भटक्यांचा समावेश झाल्याने ओबीसींना प्रत्यक्षात १९ टक्केच लाभ मिळेल. चुकीच्या नोंदींची माहिती दिसून आल्यास जनगणनेवर आक्षेप घेण्यात येतील, असेही भुजबळ यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जातनिहाय जनगणनेची घोषणा केल्यानंतर गावोगावी जनजागृतीचे परिषदेमार्फत काम केले जाणार आहे. गणना यशस्वी करण्यासाठी जिल्हानिहाय आढावा घेऊन कार्यकर्त्यांना सज्ज करण्यात येत आहे. समता परिषदेने ओबीसींच्या हक्कासाठी वेळोवेळी आंदोलने केली. विविध उपक्रम राबवून



जनजागृती केली. खासदार असताना दोन हजार नऊ साली जातनिहाय जनगणनेचा मुद्दा रेटून धरला. यानंतर जातनिहाय गणना झाली पण, सत्ता बदलल्यानंतर अनेक त्रुटी असल्याचे कारण समोर करून ती जाहीर केली नाही, याकडेही समीर भुजबळ यांनी लक्ष वेधले. छगन भुजबळ यांना मंत्रिपद मिळावे, यासाठी समता परिषद दबावाचे राजकारण करते, हा आरोप समीर भुजबळ यांनी फेटाळून लावला.

# बालकलाकार म्हणून गाजवली इंडस्ट्री

## २० वर्षांनी मोठ्या रणवीर सिंगसोबत करणार रोमान्स; आहे तरी कोण ही अभिनेत्री?



**मुंबई** - रणवीर सिंगच्या ४० व्या वाढदिवसानिमित्त निर्मात्यांनी त्याच्या बहुप्रतिक्षित चित्रपट धुरंधरचा पहिला लूक शेअर केला आहे. धुरंधरच्या पहिल्या व्हिडिओमध्ये रणवीरचा लूक पाहून सगळेच थक्क झाले आहेत. चित्रपटात रणवीर एका अतिशय विचित्र अवतारात दिसत आहे. तसंच, चित्रपटात त्याची गर्लफ्रेंड म्हणून अभिनेत्री सारा अर्जुनची पहिली झलक दिसली. पहिल्या व्हिडिओमध्ये साराच्या काही झलक दाखवण्यात आल्या आहेत आणि त्यापैकी बहुतेक तिचे रणवीरसोबतचे रोमँटिक सीन्स आहेत. यामध्ये सारा अर्जुनचा मॉडर्न लूक पाहून तिला ओळखणं कठीण झालंय. कोण आहे ही अभिनेत्री? जाणून घ्या. रणवीरचा आज वाढदिवस असून तो ४० वर्षांचा झाला आहे. तर साराचा जन्म १८ जून २००५ रोजी झाला असून ती २० वर्षांची आहे. सारा आणि रणवीरमध्ये २० वर्षांचा फरक आहे.प्रसिद्ध दाक्षिणात्य अभिनेता राज अर्जुनची मुलगी सारा अर्जुन ही एक लोकप्रिय स्टार किड आहे. जिनं लहान वयातच आपली ओळख निर्माण केलीये. मीडिया रिपोर्टनुसार, ती भारतातील सर्वात जास्त मानधन घेणारी बालकलाकार आहे. धुरंधरमध्ये रणवीर सिंगची सह-कलाकार असलेली साराने वयाच्या दुसऱ्या वर्षापासून अभिनयाला सुरुवात केली. ती पूर्ण वाक्येही बोलू शकत नसताना तिनं शोबिजमध्ये प्रवेश केला. तिनं लहानपणी जाहिरातींमधून तिच्या कारकिर्दीची सुरुवात केली. वयाच्या पाचव्या वयापर्यंत ती १०० हून अधिक टीव्ही जाहिरातींमध्ये दिसली. तिनं अनेक मोठ्या ब्रँडसोबत काम केलं आहे.चित्रपट स्टार होण्यापूर्वीच साराने तिची ओळख निर्माण केली आहे. सारा तिच्या पहिल्या देईवा थिरुमगल (२०११) या चित्रपटातून लोकप्रिय झाली. साराने एक थी डायन, ४०४, जज्बा आणि द सॉन्ग ऑफ स्कॉर्पियन्स सारख्या चित्रपटांमधून बॉलिवूडमध्ये स्वतःची छाप पाडली आहे. याशिवाय तिनं ऐश्वर्या रायच्या पोन्नियिन सेल्वनः आय अँड या चित्रपटातही महत्त्वाची भूमिका साकारली आहे. दरम्यान, धुरंदर हा सिनेमा ५ सप्टेंबर रोजी प्रदर्शित होणार आहे.

# माझ्याकडे असं का बघतोस?

## पूर्ववैमनस्यातून तरुणावर वार, जागीच ठार

**कोल्हापूर** : कोल्हापुरात गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे. यामध्येच आणखी एक भयंकर घटना घडली आहे. पूर्ववैमनस्यातून फक्त एकमेकांकडे बघण्याच्या कारणावरुन एका तरुणाचा खून झाल्याची घटना उघडकीस आली. रात्रीच्या वेळी धारदार शस्त्राने वार करुन हा खून करण्यात आला होता. मात्र याच्या काही तासातच या प्रकरणाचा छडा लावण्यात कोल्हापूर पोलिसांना यश आले आहे. कोल्हापूरच्या शिरोळ तालुक्यात कुरुंदवाडमध्ये पूर्ववैमनस्यातून एका तरुणाचा खून झाल्याची धक्कादायक घटना घडली. सिद्धार्थ चौकात शनिवारी (६ जुलै) रात्री अकरा वाजता सुमारास ही घटना घडली. याप्रकरणी पोलिसांनी अवघ्या काही तासांत तिघा आरोपींना अटक केली आहे. त्यांच्या मुसक्या आवळण्यात स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा आणि कुरुंदवाड पोलिसांना यश आलं आहे. मृत तरुणाचं नाव अक्षय दीपक चव्हाण (रा. मंजरेवाडी, कुरुंदवाड, ता. शिरोळ) आहे. त्याला धारदार शस्त्राने वार करून ठार करण्यात आलं. याप्रकरणी मृताच्या भावाने दिलेल्या तक्रारीवरून यश काळे (रा. कुरुंदवाड) आणि त्याच्या इतर दोन साथीदारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.५ जुलैला मृत अक्षय चव्हाण आणि आरोपी यश काळे यांच्यात एकमेकांकडे बघण्याच्या कारणावरून वाद झाला होता. त्यावेळी अक्षयने यश काळेला मारहाण केली होती. त्याचा राग मनात धरून यश आणि त्याचे साथीदार अमन जमीर दानवाडे (रा. इचलकरंजी) आणि श्रीजय बाबू बडसकर (रा. औरवाड) या तिघांनी मिळून अक्षय चव्हाण याच्यावर धारदार शस्त्राने वार केले. या हल्ल्यात अक्षयचा जागीच मृत्यू झाला आहे.पोलिसांचा शिताफीने लावला संशयितांचा शोध खून झाल्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगानं फिरवली. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक रविंद्र कळमकर यांच्या मार्गदर्शनाखाली पथक तयार करण्यात आलं. या पथकातील पोलीस कर्मचारी संजय कुंभार आणि सागर माने यांना मिळालेल्या माहितीनुसार आरोपी शिरोली एमआयडीसी परिसरात लपल्याचं समोर आलंत्यानंतर पोलिसांनी पाच तास शिरोली एमआयडीसी परिसरात शोधमोहीम राबवली.

# बेफिकीर वाहन चालवणाऱ्या चालकांना सर्वोच्च दणका, हजारोंचे हप्ते भरुनही कुटुंबाला विम्याचे पैसे मिळणार नाही

**नवी दिल्ली** : रस्ते अपघात आणि विम्याशी संबंधित एका प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने ऐतिहासिक निकाल दिला आहे. न्यायालयाने म्हटले आहे की एखाद्या चालकाचा स्वतःच्या चुकीमुळे मृत्यू झाला तर विमा कंपन्या त्याच्या कुटुंबाला भरपाई देण्यास बांधील नाहीत. हा निर्णय रस्त्यांवर धोकादायक स्टंट करणाऱ्या किंवा निष्काळजीपणे गाडी चालवणाऱ्यांसाठी एक मजबूत संदेश आहे. न्यायालयाने स्पष्ट केले आहे की अशा प्रकरणांमध्ये विमा कंपन्या भरपाई देण्यास बांधील नाहीत. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे म्हटले आहे की अतिवेग किंवा स्टंटबाजीमुळे अपघात झाल्यास विम्याचे पैसे दिले जाणार नाहीत. यासाठी विमा कंपन्यांना सक्ती करता येणार नाही.न्यायमूर्ती पी.एस. नरसिंह आणि आर. महादेवन यांच्या खंडपीठाने एका व्यक्तीच्या कुटुंबाला दिलासा देण्यास नकार दिला ज्याचा वेगाने गाडी चालवताना मृत्यू झाला. गाडी चालवताना मृतव्यक्ती निष्काळजीपणाने वागला होता, ज्यामुळे कार उलटली. मृताच्या कुटुंबाने युनायटेड इंडिया इन्शुरन्स या विमा कंपनीकडून ८० लाख रुपयांची भरपाई मागितली होती पण, खंडपीठाने ही याचिका फेटाळून लावली. न्यायालयाने म्हटले की, एखाद्या व्यक्तीचा स्वतःच्या चुकीमुळे मृत्यू झाला तर त्याच्या कुटुंबातील सदस्य विम्याच्या पैशांवर दावा करू शकत नाही.गेल्या वर्षी २३ नोव्हेंबर रोजी कर्नाटक उच्च न्यायालयाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवला, ज्यामध्ये कर्नाटक उच्च न्यायालयाने भरपाईची मागणी फेटाळून लावली होती. १८ जून २०१४ रोजी एन.एस. रविश नावाची व्यक्ती फियाट लाइना कार चालवत होता. त्याच्यासोबत वडील, बहीण आणि मुले होती. रविश वेगाने गाडी चालवत होता आणि त्याने वाहतूक नियमांचे उल्लंघन केले. त्याचे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि गाडी रस्त्यावर उलटली.

या अपघातात रविश गंभीर जखमी झाला आणि त्याचा मृत्यू झाला. त्याची पत्नी, मुलगा आणि पालकांनी भरपाई म्हणून ८० लाख रुपयांची मागणी केली. त्यांनी सांगितले की रविश एक यशस्वी कंत्राटदार होता आणि दरमहा ३ लाख रुपये कमवायचा. पोलिसांनी आरोपपत्रात रविशच्या निष्काळजीपणे गाडी चालवल्यामुळे अपघात घडल्याचे म्हटले. मोटार अपघात न्यायाधिकरणाने कुटुंबाचा भरपाईचा दावा फेटाळून लावला.या




खटल्याची सुनावणी करताना कर्नाटक उच्च न्यायालयाने रविशाच्या कुटुंबाचा अपघात टायर फुटल्यामुळे झाल्याचा दावाही फेटाळून लावला. न्यायालयाने म्हटले होते की मृत व्यक्तीच्या कायदेशीर प्रतिनिधींकडून दावा केला जातो तेव्हा सिद्ध करावे लागते की अपघात मृत व्यक्तीच्या निष्काळजीपणे वाहन चालवल्यामुळे झाला नाही आणि मृत व्यक्ती विमा पॉलिसी अंतर्गत असल्याचेही सिद्ध करावे लागते.

या प्रकरणात अपघात स्पष्टपणे निष्काळजीपणे गाडी चालवल्यामुळे झाला आणि अपघातग्रस्त स्वतःच दोषी होता. त्यामुळे, कुटुंब मृत्यूसाठी कोणत्याही प्रकारची भरपाई मागू शकत नाही.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पटक पटक के मारेंगे! राज ठाकरेंना थेट आव्हान; वादग्रस्त विधानं करणारे निशिकांत दुबे नेमके कोण?





**मुंबई:** मराठी भाषा न बोलणाऱ्या अमराठी दुकानदाराला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी चोप दिल्याची घटना गेल्याच आठवड्यात घेतली. त्याचा उल्लेख मनसे प्रमुख राज ठाकरेंनी शनिवारी झालेल्या विजयी मेळाव्यात केला. मराठी बोलणार नाही, असं कोणी उर्मटपणे म्हणत असेल तर त्याला चोपा, पण व्हिडीओ काढू नका, असा सल्ला राज यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांना दिला. त्यावरुन भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांनी राज ठाकरेंवर कडाडून टीका केली आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंची शिवसेना महापालिका निवडणूक डोळ्यासमोर ठेवून राजकारण करत आहे. त्यांच्याच हिंमत असेल तर त्यांनी बिहार, उत्तर प्रदेश किंवा तमिळनाडूत यावं. त्यांना आपटून आपटून मारु, असं वादग्रस्त विधान दुबे यांनी केलं. मराठी बोलावं लागेल, असं ते म्हणतात. तुम्ही कोणाची भाकर खात आहात? तिथे टाटा, बिर्ला, रिलायन्स आहे. महाराष्ट्रात एकही युनिट नाही. टाटांनी पहिला कारखाना बिहारमध्ये सुरु केला. तुम्ही आमच्या पैशांवर जगताय. तुमच्याकडे कोणते उद्योग आहेत? खाणी आमच्याकडे आहेत, झारखंड, छत्तीसगड, मध्य प्रदेश, ओडिशात खाणी आहेत. तुमच्याकडे कोणत्या खाणी आहेत, असा सवाल दुबेंनी विचारला.निशिकांत दुबे झारखंडच्या गोड्डा मतदारसंघाचे खासदार आहेत. २००९ पासून ते गोड्डा मतदारसंघाचं लोकसभेत प्रतिनिधीत्व करतात. २००९ मध्ये त्यांनी काँग्रेस उमेदवाराचा ६० हजार मतांनी पराभव केला. यानंतर २०१४, २०१९ आणि २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकांमध्ये ते लाखापेक्षा अधिक मताधिक्क्यानं निवडून आले. दुबे यांचे वडील डाव्या विचारांचे होते. पण दुबे उजव्या विचारसरणीचे आहेत. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतून ते भाजपमध्ये सक्रिय झाले. निशिकांत दुबे यांनी सुरुवातीला भाजपचे वरिष्ठ नेते अरुण जेटली, गोविंदाचार्यांसोबत काम केलं. दुबे यांच्याविरोधात ९ गुन्ह्यांची नोंद आहे. तशी माहिती त्यांनी शपथपत्रात दिलेली आहे. झारखंडमध्ये कॉलेज जमीन हडपल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. एका उद्योजकाकडे २ कोटी रुपये मागितल्याची आरोप दुबे दाम्पत्यावर आहे.

वादग्रस्त आणि बेताल विधानांमुळे ते चर्चेत असतात. एप्रिलमध्ये त्यांनी तत्कालीन सरन्यायाधीशांविरुद्ध विधान केलं. देशभर होणाऱ्या गृहयुद्धांना सरन्यायाधीश संजीव खन्ना जबाबदार असल्याचं दुबे म्हणाले होते. तुम्ही निवडणूक आयुक्त नव्हे, तर मुस्लिम आयुक्त होतात. झारखंडमध्ये तुमच्या काळातच बांग्लादेशी घुसखोर मतदार बनले, असं वादग्रस्त विधान दुबे यांनी केलं होतं. तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रांवरही त्यांनी सनसनाटी आरोप केले. मोईत्रांनी उद्योजक हिरानंदानींकडून पैसे, भेटवस्तू घेऊन लोकसभेत प्रश्न विचारले, असं दुबे म्हणाले होते. राजीव गांधी फाऊंडेशन आणि सोनिया गांधींचे जॉर्ज सोरोसशी संबंध असल्याचा आरोप त्यांनी केला होता

# अनैतिक संबंधात पती अडसर; शांत डोक्याने रचला कट, एका संशयाने फुटले बिंग, नागपुरात खळबळ...




**नागपूर :** प्रियकराच्या मदतीने पतीची हत्या केल्याच्या बऱ्याच घटना गेल्या काही महिन्यांत समोर आल्या आहेत. नागपुरातही अशीच घटना समोर आली आहे. पत्नीने प्रियकराच्या मदतीने आपल्या आजारी पतीची हत्या केल्याची घटना वाठोडा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील साईनाथ सोसायटी परिसरात समोर आली आहे. चंद्रसेन बाळकृष्ण रामटेके असे मृत व्यक्तीचे नाव आहे. चंद्रसेनची पत्नी दिक्षा रामटेकेने प्रियकर आसीफ राजा ईस्लाम अंसारी उर्फ राजा बाबू टायरवालाच्या मदतीने हा खून केल्याची कबुली दिली आहे. चंद्रसेनला अर्धांगवायू झाला होता. त्यामुळे गेल्या दीड वर्षांपासून चंद्रसेन आधीच अंथरुणाला खिळला होता. रामटेके दाम्पत्याला २ मुली आणि १ मुलगा अशी तीन अपत्ये आहेत. चंद्रसेनला अर्धांगवायू झाल्याने दीक्षा घरातील कमवती महिला झाली होती. तिने आरओ पाण्याचा व्यवसाय सुरू केला. तो ती यशस्वीपणे करीत होती. चंद्रसेनच्या आजारपणाच्या काळात तिचे राजाशी विवाहबाह्य संबंध सुरू झाले. गेल्या काही काळात चंद्रसेनच्या प्रकृतीत सुधारणा झाली होती. त्याला दीक्षाच्या विवाहबाह्य संबंधांची कुणकुण लागली. यावरून पती- पत्नीत भांडण सुरू झाले. अखेर, आपल्या अनैतिक संबंधात पती अडसर होत असल्याने दिशाने बाबू टायरवालाच्या मदतीने चंद्रसेनच्या खूनाचा कट रचला. या दोघांनी संगनमत करीत शुक्रवारी उशीच्या मदतीने चंद्रसेनचे नाक आणि तोंड दाबले. त्याचा श्वास कोंडला गेला. यात चंद्रसेनचा मृत्यू झाला. तो निपचित पडला. यानंतर दिक्षाने कांगावा केला. लोकांना गोळा केले. तसाही चंद्रसेन आजारीच होता. त्यातच त्याला हृदयविकाराचा धक्का आला असावा व तो मरण पावला असावा, असा बनाव तिने रचला चंद्रसेनचा भाऊ संजयच्या मनाला हे सारे पटत नव्हते.

पत्नीचे विवाहबाह्य संबंध असल्याचे चंद्रसेनने कदाचित संजयला सांगितले असावे. त्यामुळे संजयला या सगळ्या प्रकारावर संशय आला. त्याने पोलिसांत तक्रार केली. अखेर, चंद्रसेनच्या मृतदेहाचे मेडिकलमध्ये शवविच्छेदन झाले. यात त्याचे तोंड दाबल्याने त्याचा श्वास कोंडून मृत्यू झाला असावा असा अभिप्राय डॉक्टरांनी दिला. पोलिसांनी ताबडतोब दीक्षा व तिचा प्रियकर राजा यांना ताब्यात घेतले. पोलिसी हिसका दाखविताच दोघांनी कबुली दिली. पोलिसांनी दोघांवर खुनाचा गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली.

# बाबो! रणबीरला रामायणसाठी मिळाले तीन आकडी मानधन; रक्कम साई पल्लवीच्या फीपेक्षा १२ पटींनी जास्त...

**मुंबई:** नितेश तिवारी यांच्या रामायण सिनेमाचा लार्जर दॅन लाइफ असा अनुभव देणारा पहिलावहिला टीजर काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झाला. त्यानंतर या सिनेमात मुख्य भूमिका साकारणाऱ्या रणबीर कपूर आणि साई पल्लवी यांच्या मानधनाची चर्चा आहे. त्यांना मिळालेल्या फीपेक्षा दोघांना मिळालेल्या रकमेमधील तफावत लक्ष वेधून घेणारी ठरली. असे समोर आले आहे की, साई पल्लवीला रणबीरपेक्षा ९२ टक्क्यांनी कमी मानधन मिळाले. मीडिया रिपोर्टनुसार, रणबीर रामायण सिनेमाच्या दोन्ही भागांसाठी मिळून एकूण १५० कोटी, तर साई पल्लवीला १२ कोटी रुपये मानधन मिळाले आहे. साई पल्लवीला रणबीर कपूरपेक्षा ९२% कमी मानधन मिळालं असल्याचं बोललं जात आहे.फिल्मफेअरने दिलेल्या वृत्तानुसार, सिनेमाच्या दोन्ही भागांसाठी रणबीरला प्रत्येकी ७५ कोटी रुपये, म्हणजेच एकूण १५०कोटी रुपये मिळतील. तर सीतामातेची भूमिकासाकारणाऱ्या साई पल्लवीला प्रत्येक भागासाठी ६ कोटी रुपये, म्हणजेच एकूण १२ कोटी मिळणार असल्याचा दावा केला जातो आहे.याबद्दल अजून कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.रामायण दोन भागांमध्ये प्रदर्शित होणार असून, पहिला भाग २०२६ च्या दिवाळीदरम्यान आणि दुसरा भाग २०२७ च्या दिवाळीमध्ये प्रदर्शित होईल. या चित्रपटात साई पल्लवी-रणबीरसह यश, रवि दुबे, सनी देओल, लारा दत्ता आणि अरुण गोविल यांच्याही भूमिका आहेत. नितेश तिवारी दिग्दर्शित या सिनेमाची झलक काही दिवसांपूर्वीच समोर आली होती. ज्यामध्ये प्रभू रामचंद्रांच्या भूमिकेतील रणबीर आणि रावणाच्या भूमिकेतील यश यांचा लूक समोर आलेला. या टीजरमध्ये केवळ काही सेकंदाची झलक दिसल्याने चित्रपटाबद्दलची उत्सुकता वाढली आहे.बॉलिवुड हंगामाच्या एका रिपोर्टनुसार, निर्माता नमित मल्होत्रा यांच्या जवळच्या व्यक्तीने अशी माहिती दिली की, रामायण भाग १ची निर्मिती ९०० कोटींच्या बजेटमध्ये होणार असून, दुसऱ्या भागासाठी ७०० कोटी रुपये खर्च करण्यात आलेत. या रिपोर्टनुसार, सिनेमाचे बजेट १६०० कोटी रुपये असल्याचे बोलले जातेय.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ते खाल्ल्या मिठाला जागतायत, त्यांचा मित्रपक्ष..; पलावा पुलावरून राजू पाटलांचा शिंदे गटावर हल्लाबोल...

**डोंबिवली :** दोन दिवसांपूर्वी उद्घाटन करण्यात आलेल्या पलावा पुलावरून कल्याण डोंबिवलीत पुन्हा एकदा शिवसेना आणि मनसे - ठाकरे गट आमने-सामने उभे ठाकलेत. ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख दीपक म्हात्रे यांनी डीसीपी अतुल झेंडे यांची भेट घेत या अर्धवट पुलाचे उद्घाटन करणाऱ्यांसह पुलाचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधित ठेकेदारावर संतोष मनुष्य व त्याचा गुन्हा दाखल करा अशी मागणी केली आहे .तर मनसे नेते माजी आमदार राजू पाटील यांनी सत्ताधाऱ्यावर सडकून टीका करताना ,ड्बड्बपुलाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे. भीतीपोटी पुलाचे घाईत लोकार्पण केलं. सत्ताधारी ठेकेदाराला काही बोलत नाहीत ते खाल्ल्या मिठाला जागतायत. या पुलावर लोकांचे बळी जातील





त्यामुळे पुलाच्या रस्त्याची दुरुस्ती करून मगच पूल सुरु करावा अशी मागणी केली.अनेक महिन्यांपासून उद्घाटनाच्या प्रतीक्षेत असलेल्या कल्याण डोंबिवलीतील पलावा पुलाच्या एका मार्गिकेचे दोन दिवसांपूर्वी लोकार्पण करत हा पूल वाहतुकीसाठी खुला करण्यात आला .मात्र पुलावरील रस्त्याच्या काही भाग गुळगुळीत असल्याने दोन दुचाकीस्वार पडून अपघात झाला. त्यानंतर काही क्षणात पुन्हा पूल बंद करत युद्धपातळीवर या पुलावरील रस्त्याचे काम हाती घेण्यात आले. तासाभराने पुन्हा पूल सुरु करण्यात आला . मात्र त्यानंतर पुलावरील रस्त्याची केलेली तात्पुरती डागडुजी टीकेचा विषय ठरली आहे .या पुलावर दुचाकीस्वाराना गाडी चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे .याबाबत ठाकरे गटासह आक्रमक मनसेने आक्रमक पवित्रा घेतलाय.

घाई घाईत या पुलाचे लोकार्पण केलं त्यानंतर बाईकचे अपघात झाले पुल पुन्हा बंद केला.ग्रीट पावडर टाकून पूल पुन्हा सुरू केलाय .मात्र पुलाचं काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले आहे . सत्ताधारी ठेकेदाराला काही बोलत नाही कारण ते खाल्ल्या मिठाला जागतायत . दीडशे कोटींचा पुल सात आठशे कोटी पर्यंत पैसे खाण्यासाठी नेला. त्यांचे मित्र पक्ष सहन करत असतील मनसे सहन करणार नाही . या पुलाचं लोकार्पण करताना त्यांना भीती होती. ठेकेदाराचे आणि त्याच्या इतर शेल कंपन्या त्यांची चौकशी करण्यात यावी तेव्हा इथलं काळं बेरं बाहेर येईल.या पुलावरील रस्त्याची दुरावस्था झाली त्यामुळे अनेक अपघात होत आहेत या पुलाचे काम अर्धवट होते .

लवकरात लवकर पुलाचे काम पूर्ण करून उदघाटन करा अशी मागणी केली होती मात्र आम्ही उदघाटन करू या भीतीने त्यांनी अर्धवट पुलाचे उदघाटन केलं असा टोला नाव न घेता शिवसेना शिंदे गटाचे आमदार राजेश मोरे यांना टोला लगावला. ज्यांनी या अर्धवट पुलाचे उद्घाटन केलं ज्या ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे काम केलं त्याच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांनी डीसीपी अतुल झेंडे यांच्याकडे केली आहे.

# बुडत्यांना एकीचा आधार; मनोमिलनामुळे मनसे, शिवसेना उबाठाची उद्ध्वस्त गढी सावरणार?

**नाशिक:** शिवसेना ठाकरे गटाची नाशिकची गढी उद्ध्वस्त झाल्यानंतर मनसे आणि ठाकरे गटाच्या संभाव्य मनोमिलनामुळे ठाकरे गटाला मोठा आधार मिळणार आहे. गेल्या वेळेस निवडून आलेल्या ३५ पैकी सद्य:स्थितीत ठाकरे गटात पाच माजी नगरसेवक शिल्लक राहिले आहेत, तर सध्याचे महानगरप्रमुख भाजपमधूनच आयात झाले असल्याने ही संख्या आता सहावर पोहोचली आहे. दिनकर पाटीलही भाजपमधूनच मनसेत आल्याने या दोन्ही पक्षांची धुरा ही आयारामांच्या हातात एकवटली आहे. सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका घेण्याचे निर्देश दिल्यानंतर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे पानिपत झाल्यानंतर मविआतील पक्षांना ओहोटी लागली. त्याचा सर्वांत मोठा फटका शिवसेना ठाकरे गटाला बसला असून, नाशिकसह राज्यात या पक्षातून शिवसेना शिंदे गट आणि भाजपमध्ये जाणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. मात्र, आता या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाला आता



मनसेचा आधार मिळणार आहे. मराठी भाषेच्या निमित्ताने राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे प्रथमच एका व्यासपीठावर आले. त्यामुळे या दोन्ही पक्षांचा उद्ध्वस्त झालेला नाशिकचा गड सावरण्याच्या आशा निर्माण झाली आहे. नाशिक हा शिवसेना आणि मनसेचाही गड राहिला आहे.महापालिकेत २०१२ पूर्वी शिवसेनेची, तर २०१२ ते २०१७ पर्यंत मनसेची सत्ता राहिली आहे. त्यामुळे नाशिककरांवर शिवसेनेचे गारूड राहिले आहे, तर महापालिकेतही शिवसेनेचा महापौर राहिला असून, अनेक वर्षे नाशिकचा खासदार राहिला आहे. मात्र, हे दोन्ही पक्ष सध्या नाशिकमध्ये जर्जर झाले आहेत. शिवसेनेच्या फुटीनंतर नाशिकमध्ये ३५ पैकी पाच माजी नगरसेवक उबाठासोबत राहिले आहेत. जवळपास २२ माजी नगरसेवक शिंदे गटात गेले आहे, तर पाच माजी नगरसेवक हे भाजपसोबत गेले आहेत, तर तिघांचे निधन झाले आहे. गेल्या वेळेस मनसेचे पाच नगरसेवक निवडून आले असले तरी सलीम शेख यांच्या रूपाने एकमेव माजी नगरसेवक सध्या पक्षात आहे, तर दिनकर पाटील भाजपमधून मनसेत आले आहेत. सद्य:स्थितीत पक्ष वाढविण्याचे खडतर आव्हान स्थानिक नेतृत्वावर असेल.

# नवी मुंबईत ट्रक टर्मिनलमध्ये भीषण अग्नितांडव; ८ ते १० ट्रक जळाल्याची शक्यता



**नवी मुंबई :** नवी मुंबईतील एपीएमसी मार्केट शेजारी असलेल्या एका ट्रक ट्रमिनलमध्ये भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. या आगीत ८ ते १० ट्रक, टेम्पो जळाल्याची शक्यता वर्तवली जात आहे. तर कॅरेट आणि ट्रेच्या गोडाऊनमुळे ही आग पसरली असल्याचे समोर आलं आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि अग्निशमन पथकाचे जवान घटनास्थळी दाखल झालेत. दरम्यान, तीन तासांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले आहे. मात्र ही आग नेमकी कशामुळे लागली हे अद्याप कळलेलं नाही. सध्या पोलीस या घटनेचा तपास करत असून सुदैवाने या आगीत अद्यापतरी कुठलीही जीवितहानी झाल्याची माहिती समोर आलेली नाही. मात्र मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाल्याचे वृत्त आहे. नवी मुंबईतील एपीएमसी मार्केट नजीक तुर्भे सेक्टर २० येथे ट्रक टर्मिनल आहे. या ठिकाणी एपीएमसीला येणाऱ्या गाड्या थांबत असतात. अशा गाड्यातील माल उतरून ठेवण्यासाठी येथे एका गोडाऊनमध्ये माल ठेवण्यात येतो. याच गोडाऊन मध्ये मोठ्या प्रमाणात प्लास्टिकचा माल ठेवण्यात आला होता. या गोडाऊन मध्ये रात्री साडे आकाराच्या सुमारास आग लागल्याची वर्दी वाशी अग्निशमन दलास मिळाली होती. तुर्भे एमआयडीसी नेरूळ एमआयडीसी, कोपरखैरणे वाशी नेरूळ अशा ठिकाणच्या अग्निशमन गाड्या घटनास्थळी रवाना झाल्या होत्या.लाकडी कॅरेट आणि प्लास्टिकमुळे आग क्षणात पसरली. आगीचे लोळ इतके प्रचंड होते की काही मिनिटातच परिसरात धुराचे लोट पसरले. तेथे अग्निशमन पथक तात्काळ पोहचले होते. या दुर्घटनेत सुदैवाने अद्याप कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती नाही. मात्र मोठ्या प्रमाणावर मालाचे नुकसान झाल्याची शक्यता आहे. अग्निशमन विभागाचे खबरदारी म्हणून परिसरातील नागरिकांना सुरक्षित अंतरावर हलवण्यात आले होते. आग लागण्याचे नेमके कारण अजून स्पष्ट झाले नसले तरी इलेक्ट्रिकल शॉर्टसर्किट किंवा ज्वलनशील पदार्थांमुळे आग भडकली असावी, असा प्राथमिक अंदाज आहे.

# वडनेर भोलजी येथे महीला पत्रकार तथा समाजसेविका उमाताई बोचरे यांची छळछाल करणाऱ्या आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल.

**जनसंचलन/ नांदुरा**

वडनेर भोलजी (ता. नांदुरा) येथे एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे, ज्यामध्ये स्थानिक समाजसेविका उमाताई गोपाल बोचरे यांचा छळ केल्याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणात अजमतबेग उर्फ बाबामिर्झा अकबरबेग मिर्झा (वय ३७), रा. वडनेर भोलजी याच्यावर विविध कलमांतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. ही घटना १ मे २०२५ ते ३ जुलै २०२५ दरम्यान घडल्याचे पोलिस हकीकतीत नमूद करण्यात आले आहे. फिर्यादी उमाताई बोचरे या समाजसेवेच्या कार्यासाठी गावात फिरत असताना आरोपीने त्यांचा छुप्या पद्धतीने पाठलाग केला. तसेच लज्जा उत्पन्न होईल असे इशारे, हातवारे करून त्रास दिला आणि नको त्या प्रकारे जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. त्यातच जर फिर्यादीने आरोपीसोबत काम न केल्यास तिची खोटी बदनामी करणारी बातमी प्रसारित करणार असल्याची धमकी दिली गेली. यावरून दि. ३ जुलै २०२५ रोजी ङ्कङ्कदैनिक जागृत मालकङ्कङ्क या स्थानिक वृत्तपत्रात फिर्यादीची बदनामी होईल असा मजकूर प्रसिद्ध करण्यात आला, असेही फिर्यादीत नमूद आहे.




ही तक्रार पोलीस कॉन्स्टेबल शकील तडवी (ब.नं. १८६५) यांनी ओपी चौकी वडनेर भोलजी येथे आणून सादर केली. त्यानंतर पोलीस कर्मचारी सोळंके व नं. २८८ यांनी पुढील प्रक्रिया करत गुन्हा क्रमांक ३६७/२०२५, भारतीय न्यायसंहितेतील कलम ७८(२), ७९, ३५३(२)(२), ३५१(२)(३) अंतर्गत गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस नाईक चिखलकर (ब.नं. ९४६) यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. या प्रकरणामुळे वडनेर भोलजी परिसरात खळबळ उडाली असून, वृत्त लिहीपर्यंत आरोपीला अटक किंवा पोलिसात बोलवणे सुद्धा झाले नसल्याचे समजते. पोलीस आरोपीला अभय देत आहे असा समज येथील महिला वर्गात निर्माण झाला असल्यामुळे अशा या घटनेमुळे वडनेर भोलजी येथील महिलांमध्ये महिला तरुणी मध्ये भीतीचे वातावरण दिसत असून पोलिसांनी त्वरित अशा आरोपीला गजाआड करावे अशीही मागणी केल्या जात असल्याचे वृत्त आहे. समाजसेविकेवर झालेल्या मानसिक छळाविरुद्ध कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे.

# बुलढाणा शहर भाजपाकडून नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांना घेराव आंदोलन




**जनसंचलन/बुलढाणा**

दिनांक ०७ जुलै रोजी, भारतीय जनता पार्टी, बुलढाणा शहराच्या वतीने, शहरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध समस्या, आणि प्रशासनाच्या दुर्लक्षाविरोधात नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांना घेराव घालण्यात आला. नवीन पाणीपुरवठा योजनेच्या निकृष्ट कामाबाबतही यावेळी आवाज उठवण्यात आला. संबंधित अधिकाऱ्यांना कडक कारवाईची मागणी करण्यात आली. तसेच, शहरातील हातगाडी, ऑटो, व रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांची नियमित नोंदणी करणे, त्यांना ओळखपत्र देणे आणि शासनाच्या योजनांचा लाभ देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी लेखी मागणी करण्यात आली.

# सहकार पुरस्कार; सहकारी संस्थांकडून १८ जुलैपर्यंत प्रस्ताव आमंत्रीत

**जनसंचलन/बुलढाणा**

राज्यातील सहकार चळवळीला बळकटी देणाऱ्या व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सहकारी संस्थांना महाराष्ट्र शासनामार्फत सहकार पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील कामगिरीच्या आधारे या पुरस्कारासाठी पात्र संस्थांची निवड केली जाणार आहे. याबाबतचा कालबद्ध कार्यक्रम राज्य शासनाने नुकताच जाहीर केला आहे. पुरस्कारासंदर्भातील सविस्तर माहिती सहकार विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर http://sahakarayukta.maharashtra.gov.in तसेच जिल्हा उपनिबंधक व तालुका स्तरावरील सर्व सहायक निबंधक यांच्या कार्यालयात उपलब्ध करून देण्यात आली आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत नोंदणी केलेल्या इच्छुक सहकारी संस्थांनी विहित नमुन्यातील प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांसह १८ जुलै २०२५ पर्यंत संबंधित तालुका सहाय्यक निबंधक कार्यालयात सादर करावेत. सहकारी क्षेत्रातील पारदर्शक व प्रेरणादायी कार्यास शासन पुरस्कृत स्वरूपात प्रोत्साहन देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत असून जिल्ह्यातील सर्व सहकारी संस्थांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक डॉ. महेंद्र चव्हाण यांनी केले आहे.




# सहकार सप्ताह उत्साहात साजरा; विविध उपक्रमांतून सहकार चळवळीला बळ...

**जनसंचलन/बुलढाणा**



आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ व भारत सरकारच्या सहकार मंत्रालयाच्या स्थापनेला चार वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने जिल्ह्यात १ ते ६ जुलै दरम्यान सहकार सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. विविध उपक्रमाच्या माध्यमातून सहकार चळवळीला बळ देत सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. सप्ताहाचा शुभारंभ १ जुलै रोजी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलडाणा व जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-२, सहकारी संस्था, बुलडाणा यांच्या कार्यालय परिसरात वृक्षारोपणाने करण्यात आला. पर्यावरण संवर्धनाच्या संदेशासोबत सहकार व शाश्वतता यांचा सुंदर संगम या उपक्रमातून दाखविण्यात आला. बधुवार दि.२ रोजी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., बुलडाणा यांच्यावतीने शेतकरी व कर्जदारांसाठी कर्ज वितरण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांना शेतीसाठी सुलभ दराने कर्जे वितरित करण्यात आले. गुरुवार दि. ३ रोजी जिल्ह्यातील प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे पदाधिकारी व सचिव यांच्यासाठी केंद्रीय योजनांवर माहिती व चर्चासत्र घेण्यात आले. यामध्ये राष्ट्रीय सहकार धोरण, बँकिंग, शेतकरी समृध्दी योजनेविषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आले. शुक्रवार दि. ४ जुलै रोजी शिवाजी महाविद्यालय, मोताळा येथे विद्यार्थ्यांसाठी सहकार क्षेत्रावर विशेष व्याख्यान घेण्यात आले. सहकार मूल्ये, स्वावलंबन आणि ग्रामीण विकासामधील सहकाराची भूमिका या मुद्द्यांवर विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली.

शनिवार दि. ५ रोजी जिल्हा उपनिबंधक कार्यालयात स्वच्छता अभियान राबवून सहकार क्षेत्रामधील स्वच्छता आणि शिस्तीच्या मूल्यांना अधोरेखित करण्यात आले. सहकार सप्ताह २०२५ मधील हे विविध उपक्रम जिल्ह्यातील सहकारी चळवळीला अधिक बळकट करतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. सप्ताहाचा समारोप रविवार दि. ६ जुलै रोजी केंद्र शासनाच्या सहकार मंत्रालयाच्या स्थापना दिनानिमित्त विविध रंगांनी सजलेली रांगोळी स्पर्धा आयोजित करून करण्यात आला. या उपक्रमामध्ये सहकारी संस्थांचे कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# चिखली एमआयडीसी परिसरात पाइप चोरीचा प्रयत्न उधळला!

जनसंचलन/ साखरखेर्डा

चिखली एमआयडीसी परिसरात पाइपलाइन टाकण्यापुर्वीच ती चोरण्याचा प्रयत्न करणारी आंतरराज्य टोळी साखरखेर्डा पोलिसांनी पकडली असून, चार ट्रकपैकी दोन जप्त करण्यात आले आहेत. १६ आरोपींपैकी चार जणांना पोलिसांनी अटक केली असून, इतर आरोपींचा शोध सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पेनटाकळी-चिखली पाणीपुरवठा योजनेसाठी रस्त्यालगत लोखंडी पाइप टाकण्यात आले होते. ६ जुलै रोजी रात्री चिखली-लव्हाळा रोडवर हीरयाणा व बिहार येथून आलेली चार ट्रक संशयास्पद स्थितीत उभी असल्याचे स्थानिक ७/१२ हॉटेलच्या मालकाच्या लक्षात आले. एका ट्रकमध्ये पाइप भरताना काही चालकांनीही पाहिले. यामुळे संशय बळावला आणि नागरिकांनी तत्काळ साखरखेर्डा पोलिसांना माहिती दिली. बीट जमादार बाजीराव खरात आणि ठाणेदार गजानन करेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तत्काळ कारवाई सुरू केली. पोलिस वाहन येत असल्याचे लक्षात येताच एक ट्रक हरियाणा व बिहारणधून आलेले ट्रक होते संशयास्पद स्थितीत उभे होते. ट्रकमध्ये तीन पाईप ठेवण्यात आले होते. मेहकरकडे आणि उर्वरित तीन चिखलीच्या दिशेने पळाले. मेहकर पोलिसांनी लोणार चौफुलीवर ट्रक आडवा लावून एक ट्रक जप्त केला. दुसरे वाहन धामणगाव पोलिसांनी मोबाइल लोकेशनच्या मदतीने जप्त केले. उर्वरित दोन ट्रक फरार झाली आहेत. जप्त केलेल्या एका ट्रकमध्ये तीन लोखंडी पाइप आढळून आले आहेत. ही टोळी पूर्वी संबंधित कंपनीला पाइप पुरवते आणि काही दिवसांनी परत येऊन तीच पाइप चोरते, असा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. या आधीही बीबी पोलिस ठाण्याच्या हद्दीत अशाच प्रकारची पाइप चोरी झाल्याची माहिती असून, त्या दिशेने तपास सुरू आहे.

# पंढरपूर येथून परतताना वारकऱ्याची आत्महत्या

जनसंचलन/ चिखली

आषाढी वारी करून पंढरपूर येथून परतणाऱ्या बुलडाणा जिल्ह्यातील मिसाळवाडी येथील वारकरी सुखदेव लक्ष्मण रावे (वय ६२) यांनी रुईछत्तीसी (जि. अहिल्यानगर) गावाजवळील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेने वारकरी समुदायात आणि गावात हळहळ व्यक्त केली जात आहे. सुखदेव रावे हे गेली २५ वर्षे नियमितपणे आषाढी वारीला जात होते. यंदाही त्यांनी प्रथम दिंडीसोबत प्रवास केला. त्यानंतर बसने पंढरपूर गाठून विठ्ठलाचे दर्शन घेतले. परतीच्या प्रवासात सोमवारी त्यांनी रुईछत्तीसी गावाजवळ गळफास घेऊन आत्महत्या केली. ते मूळचे मिसाळवाडी (ता. चिखली) येथील असून, सध्या शेळगाव रावे यांचा दरवर्षी आषाढी वारीत सक्रिय सहभाग असायचा. २५ वर्षापासून जात ते वारीला होते आटोळ येथे सलून व्यवसाय करीत होते. ते अत्यंत धार्मिक वृत्तीचे, साधी राहणीमान असलेले व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात होते. दरवर्षी आषाढी वारीत त्यांचा सक्रिय सहभाग असायचा, अशी माहिती ग्रामस्थांनी दिली. त्यांच्या आत्महत्येचे नेमके कारण समजू शकले नसून, पोलिस तपास सुरू आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, असा परिवार मुलगा, आहे.

# अनुराधा फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी डी. फार्म परीक्षेत मिळविले सुयश

जनसंचलन/ चिखली

येथील अनुराधा ग्रुप ऑफ फार्मसी अंतर्गत कार्यरत असलेल्या अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसी, प.रा.मो. शि.स. अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसी आणि कर्मयोगी तात्यासाहेब बोंद्रे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी या तीनही महाविद्यालयांनी यंदाच्या डी. फार्म व बी. फार्मच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवले आहे. या तिन्ही महाविद्यालयांतील सर्व विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. बी. फार्म अंतिम वर्षामध्ये अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसीच्या गायत्री तायडे हिने ८८.८२ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. रेणुका काळंगे हिने ८४.४६ टक्के गुण मिळवून द्वितीय तर वैष्णवी तांगडे हिने ८४.३६ टक्क्यांनी तृतीय क्रमांक मिळवला. डी. फार्मच्या प्रथम वर्षात प्रणव वानखाडे ८२.२० टक्के, सानिका गायकवाड ८०.५० टक्के आणि गायत्री महाले ७९.९० टक्के गुणांसह अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले. प.रा.मो. शि.स. अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसीच्या अंतिम वर्षात धनश्री ठाकरे हिला ८१.८२, शिवम सांगळे याला ८१.४६ तर साकिब खान याला ८०.८२ टक्के गुण प्राप्त झाले. तर प्रथम वर्षात शुभांगी काकडे ८१.००, वैष्णवी पेंढारकर ८०.४० आणि गौरी ठाकरे ७७.४० टक्के गुण मिळवून यशस्वी ठरल्या. कर्मयोगी तात्यासाहेब बोंद्रे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या अंतिम वर्षात वर्षा गायकवाड हिने ७९.७३ टक्क्यांनी प्रथम क्रमांक मिळवला. आकाश मदगे ७७.५५ व नेहा टाले ७७.४६ टक्क्यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांकावर राहिले. प्रथम वर्षात वैष्णवी थोरात ७६.९०, सलोनी ब्राम्हणे ७४.६० आणि गायत्री शिंदे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केला. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राहुल बोंद्रे, संचालक मंडळ व महाविद्यालयीन प्रशासनाने समाधान व्यक्त केले.

# सनातन हिंदू धर्म प्रचारासाठी पदयात्रा व कलश यात्रा

## ११ जुलैपासून औंढा नागनाथ येथून प्रारंभ

जनसंचलन/बुलढाणा



भारताला घटनात्मकदृष्ट्या हिंदू राष्ट्र घोषित करावे, मथुरेतील श्रीकृष्ण जन्मभूमी अतिक्रमणमुक्त करून भव्य मंदिर उभारावे, सनातन धर्माचे पुनरुत्थान व्हावे यासह विविध मागण्यांसाठी सनातन हिंदू धर्म जागरण व कलश यात्रा आयोजित करण्यात आली आहे. या पदयात्रेला ११ जुलैला औंढा नागनाथ येथून सुरुवात होणार असून १८ जुलैला मोताळा येथील रायरेश्वर महादेव मंदिरात समारोप होणार आहे. या यात्रेचा उद्देश धार्मिक व सांस्कृतिक जागृती, हिंदू एकता, सनातन धर्म व परंपरांचे संवर्धन, गौमातेचे रक्षण, तरुणांना राष्ट्रभक्तीकडे प्रेरित करणे, पर्यावरण संरक्षण, आणि संतांच्या शिकवणुकीद्वारे आध्यात्मिक उन्नती साधणे असा आहे. पत्रकार परिषदेत आंतरराष्ट्रीय कथावाचक युवाचार्य विवेकदास शास्त्री महाराज यांनी याबाबत माहिती दिली. पत्रपरिषदेला अमोल अंधारे, माधव धुंदाळे (जिल्हा मंत्री, विहिप), शांतिलाल बोरालकर, पुरुषोत्तम मापारी, सतीशचंद्र रोठे, अरुण देशमुख (सहसंयोजक, बजरंग दल), आणि उत्कर्ष डाफने (शहराध्यक्ष, विश्व हिंदू परिषद) हे मान्यवर उपस्थित होते. अधिकाधिक सनातन बांधवांनी या पदयात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन युवाचार्य विवेकदास महाराज यांनी केले आहे. या सोबतच विविध उद्दिष्टे कशी साध्य केली जातील याचीही त्यांनी सविस्तर माहिती दिली.

# महाविकास आघाडीचा शेतकरी मोर्चा ठरणार आक्रमक, दुसरबीड येथे सर्वपक्षीय बैठक!

जनसंचलन/दुसरबीड

माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी महाविकास आघाडीतील घटकपक्षांना एकत्र आणत दि. १४ जुलै रोजी सिंदखेडराजा येथे होणाऱ्या शेतकरी मोर्चाची तयारी जोरात सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर दुसरबीड येथील गीतांजली मंगल कार्यालयात सोमवारी सर्वपक्षीय बैठक पार पडली. या बैठकीत काँग्रेस, उद्धवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) या सर्व पक्षांच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. आगामी मोर्चा यशस्वी करण्यासाठी गावोगावी बैठकांचे आयोजन करून जनजागृती करण्यात येत आहे. डॉ. शिंगणे यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका करत सांगितले की,




साखरखेर्डा तालुक्याच्या वंचित स्थितीचा प्रश्न, समृद्धी महामार्गावरील नवनगर प्रकल्पातील विस्थापितांचे प्रश्न, घरकुल लाभार्थ्यांना जागेच्या अडचणी, शेतकऱ्यांची अपूर्ण कर्जमाफी आणि बँकांचा अन्यायकारक दृष्टिकोन या सर्व विषयांवर सरकार अपयशी ठरले आहे. बैठकीत काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सुनील जायभाये, छगन मेहेत्रे, पंडितराव खंदारे, आत्माराम कायंदे, विलासराव देशमुख, सत्यजित खरात, उपसरपंच अशोक गुंजाळ, तसेच महाविकास आघाडीतील विविध कार्यकर्ते उपस्थित होते. डॉ. शिंगणे यांनी कार्यकर्त्यांना १४ जुलै रोजी शेतीची अवजारे, बैलगाड्या, ट्रॅक्टरसह मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन करत जनतेच्या प्रश्नांसाठी संघर्ष उभा करण्याचा निर्धार व्यक्त केला.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८